# स्नेह समृध्दी मंडळ, देवरुख

प्रकल्प कार्यालय :- स्नेह समृध्दी मंडळ, देवरुख.

‘श्रमसाफल्य’ मधलीआळी,

देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

भ्रमणध्वनी क्रमांक :- १) सौ. श्रध्दा रामचंद्र देशपांडे - अध्यक्षा, स्नेह समृध्दी मंडळ.

९७६९२५२९४०, ९४२३२९३४९१.

२) श्री. अनिल विनायक कुडाळकर - मुख्य कार्यकारी अधिकारी.

७५२२९४०००३, ९४२०१५६९५३.

ई.मेल :- ssmdevrukh@gmail.com

snehsamruddhi@yahoo.co.in

नोंदणी क्रमांक :- एफ ११८२ (पब्लिक ट्रस्ट) १९९४ (सोसायटी)

नोंदणी दिनांक :- १६ ऑगस्ट १९९३ रत्नागिरी, महाराष्ट्र,

कार्यक्षेत्र :- महाराष्ट्र राज्य.

संस्थापक :- श्री. रामचंद्र प्रभाकर देशपांडे.

विश्वस्त सूचि :-

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | सौ. श्रध्दा रामचंद्र देशपांडे | अध्यक्ष |
| २. | सौ. शैलजा शांताराम कांगणे | उपाध्यक्ष |
| ३. | सौ. सुजाता आशिष प्रभुदेसाई | सचिव |
| ४. | सौ. दिपाली दिलीप कानडे | खजिनदार |
| ५. | सौ. दिपश्री दिलीप बोकील | सदस्य |
| ६. | सौ. युगंधरा रविंद्र आठल्ये | सदस्य |
| ७. | सौ. कविता आनंद नायगावकर | सदस्य |

संस्थेचे ध्येय :- समानतेच्या तत्वावर आधारित महिलांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रीत करुन समाजातील सर्व घटकांचा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास घडवून आणणे.

ध्येय साध्य करण्यासाठी हाती घेतलेले उपक्रम :-

वरील ध्येय प्राप्त करण्यासाठी महिला, युवक आणि पुरुषांकरीता विविध प्रकारचे प्रशिक्षण, प्रात्यक्षिक तसेच समुपदेशनासाठीचे प्रकल्प विविध व्यक्ती, संस्था आणि शासन यांच्या सहकार्याने आयोजित करणे.

## संस्थेची रचना

अध्यक्ष

↓

विश्वस्त

↓

मुख्य कार्यकारी अधिकारी

↓

कर्मचारी

## संस्थेचा महिलांसोबतचा प्रवास

स्नेह समृध्दी मंडळ या संस्थेची १९९२ मध्ये स्थापना करण्यात आली. त्यापूर्वी रत्नागिरी जिल्हयातील ग्रामीण भागातील महिलांची कौटुंबिक, आर्थिक आणि सामाजिक स्थिती अतिशय बिकट होती. ग्रामीण भागातील महिलांची वेशभूषा, केशभूषा, बोलीभाषा यांमुळे सार्वजनिक ठिकाणी त्यांना मिळणारी वागणुक खूप विचित्र असायची. महिलांच्या या स्थितीचा अभ्यास करताना असे लक्षात आले की, त्यांना मिळणाऱ्या या कमीपणाच्या वागणुकीमागे त्यांची ही परिस्थिती जबाबदार आहे. या परिस्थितीला त्यांचे व्यक्तिमत्व जबाबदार आहे. आणि त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वामध्ये बदल घडवून आणला तरच त्यांची स्थिती बदलु शकते असा विचार करुन त्यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी परिणामकारक उदा. हळदीकुंकू सारखे कार्यक्रम यांमधून शोध घेण्यास सुरुवात झाली.

दर महिन्याला या महिलांपर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक अशी माहिती, कौशल्य दयायचं. ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. उदा. महिलांना शिवणकला शिकविणे, स्वयंपाक कला शिकविणे यामध्ये सुरुवातीला बिनतेलाचे कमी खर्चाचे पण टिकावू लोणचे तयार करण्याचे कौशल्य त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यात आले. हे करीत असताना महिलांनी अपेक्षेपेक्षा खुप जास्त प्रतिसाद दिला.

- **महिला मंडळांची स्थापना** – सुरुवातीला १० गावे निवडून तेथे काम करण्यात आले. त्यादृष्टीने काम करीत असताना सन १९९२ मध्ये ४२ महिला मंडळे स्थापन करण्यात आली. महिलांसाठी विविध उपक्रम राबवून यामध्ये महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धा इ.मार्फत त्यांच्यातील कलागुणांना वाव देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. महिलांचा मिळणारा प्रतिसाद आणि त्यांच्या व्यक्तिमत्वात जाणवणारा बदल यामुळे त्यांच्यासाठी काम करण्याचा उत्साह वाढीस लागला.

❍ **बचतगटांची स्थापना** – महिलांना बचतीची सवय लागावी, वेळप्रसंगी आवश्यक असणारी आर्थिक अडचण दुर करता यावी त्याचबरोबर त्यांच्या अनेक प्रकारच्या गरजा पूर्ण करता याव्यात याकरीता बचतीचे महत्व पटवून देण्यात आले. संस्थेने कार्यक्षेत्रामध्ये एकूण ३०० बचतगटांची स्थापना केली आहे.

**स्नेह समृध्दी मंडळ बचतगट संख्या – ३०० योजनानिहाय बचतगटांची विभागणी**

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**
सुवर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना
१२०

**माविम**
(शेडयुल कास्ट प्रोग्राम)
३०

**नाबार्ड (अॅडऑन)**
५०

**सहयोग फेडरेशन**
१००

महिलांनी बचतगटामध्ये सातत्य ठेऊन जास्तीत जास्त स्वत:चा व पर्यायाने कुटूंबाचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल यावर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांनी स्थानिक पातळीवर व्यावसायिक दृष्टिकोन ठेऊनच बचतगटाची वाटचाल करावी असे या प्रशिक्षणांतून प्रवृत्त करण्यात आले.

बचतगटांना बचतगट योग्य पध्दतीने कसा चालवावा यासाठी बचतगटांची संरचना आणि तंत्र, गटासाठी मार्गदर्शक तत्वे, लेखन पध्दती नमुने, गटांतून काय साधता येईल, ग्रामपंचायत आपल्या विकासाचे महत्वाचे केंद्र कसे आहे तसेच सभासंचालनाच्या पध्दती यांविषयी संस्थेच्या अध्यक्षा सौ. श्रध्दा देशपांडे लिखित बचतगट मार्गदर्शिका ही पुस्तिका संपूर्ण जिल्हयामध्ये शासन व बचतगटांच्या मार्गदर्शनासाठी योग्य बचतगट मार्गदर्शिका म्हणून वापरण्यात आली.

शासनाच्या विविध योजनांचा बचतगटांना लाभ मिळावा यासाठी तसेच शासकीय अधिकारी व बचतगटांतील महिला यांच्यामध्ये समन्वय घडवून आणण्यामध्ये संस्थेने अतिशय महत्वाची भूमिका पार पाडली. ज्यांमुळे बचतगटांतील महिलांना विविध व्यवसाय करण्याच्या संधी उपलब्ध होऊन त्यांना रोजगाराचे आर्थिक साधन प्राप्त करता आले.





## कौशल्य प्रशिक्षण, रमाई सक्षमीकरण बचतगट प्रशिक्षण आणि बचतगट ग्रेडेशन प्रशिक्षण









बचतगटांनी शेळीपालन, भाजीपाला लागवड, ज्वेलरी मेकींग, केटरिंग सेवा इ. उदयोग सुरु केले.










यामध्ये अंजनी महिला बचतगट, देवरुख या गटाच्या उत्तम कामगिरीमुळे त्यांना पंचायत समिती देवरुख यांचेकडून केंटरिंग सेवा देण्यासाठी स्वतंत्र गाळा देण्यात आला. याच गटाला रत्नागिरी जिल्हयाचा तसेच कोकण विभागाचा "राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्काराने" सन्मानित करण्यात आले. तसेच प्रगती महिलागट देवधामापूर, जागृती महिला बचतगट सांगवे, साळूबाई बचतगट भायजेवाडी देवरुख आणि महालक्ष्मी बचतगट देवरुख या गटांनाही रत्नागिरी जिल्हयाच्या "राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार" या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

○ समृध्दी पापड उदयोग - महिला बचतगटांना मिळणाऱ्या शासकीय योजने अंतर्गत संगमेश्वर तालुक्यातील देवधामापूर व मुचरी या ठिकाणी शासनामार्फत उदयोगांसाठी इमारत बांधून देण्यात आल्या. ज्यामध्ये देवधामापूर येथील महिलांनी पापड उदयोग सुरु केला. या उदयोगातून महिलांनी तयार केलेल्या पापडसाठी परदेशातुनही प्रचंड मागणी होती. तसेच मुचरी या ठिकाणी बचतगटांनी अनेक छोटे-मोठे व्यवसाय सुरु केले. लोणचं बनविणे, वेगवेगळया प्रकारची पीठं बनवून विकणे, शेतीसाठी खतवाटप अशांसारखे उपक्रम शासनाच्या सहकार्याने संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात आले.

संस्थेच्या बचतगटांची शासनाकडून मिळणारे अनुदान यामुळे अनेक उदयोगाच्या दिशेने खुप चांगली वाटचाल सुरु झाली. परंतु शासनाच्या योजना सुरु असताना तसेच त्या राबविताना बचतगटांना योग्य प्रकारे मार्गदर्शन मिळावे या हेतुने संस्थेने बचतगटांचे फेडरेशन करण्याचे ठरविले. आणि त्यातुनच सहयोग महिला फेडरेशनची स्थापना झाली.

○ सहयोग महिला फेडरेशनची स्थापना - सन २००२ साली फेडरेशनची स्थापना करण्यात आली.

१) संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत दिनांक १६/३/२००५,
नोंदणी क्र. महाराष्ट्र/३११८ रत्नागिरी.

२) सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९ अंतर्गत दि. ९/२/२००५,
नोंदणी क्र. एफ. ३१०६ रत्नागिरी.

रचना - संगमेश्वर तालुका कार्यक्षेत्र असून तालुक्यातील प्रत्येक बचतगटाला फेडरेशनचे सदस्यत्व प्राप्त होऊ शकते.

ध्येय - महिला समुहांचा आर्थिक व सामाजिक विकास.

उद्देश-

● बचतगटांना सभासदत्व देणे.

- बचतगटांच्या गरजेनुसार विविध प्रकारच्या प्रशिक्षणांचे आयोजन करणे.
- बचतगटांना शासकीय उपक्रम, योजना राबविण्यासाठी सहकार्य करणे.
- बचतगटांच्या औदयोगिक विकासाकरीता सर्वतोपरी प्रयत्न व सहकार्य करणे.
- सदस्यांकरीता सामाजिक सुरक्षेच्या योजना राबविणे.
- सदस्यांच्या मागणीप्रमाणे उत्पादन निर्मिती करिता सहाय्य करणे किंवा स्वतः उत्पादन करणे.
- सदस्यांकरिता खरेदी-विक्रीबाबतच्या स्त्रोतांची माहिती व मार्गदर्शन देणे.
- सदस्यांच्या, संस्थेच्या तयार मालाच्या साठवणूक व वाहतुक संबंधी मार्गदर्शन करणे.
- बचतगटांना अर्थसाहाय्य उपलब्ध होण्याकरिता सहकार्य करणे.

## सहयोग महिला फेडरेशन संचलित उपक्रम

- जॉबवर्क युनिट - परिसरातील गरजू युवक, युवतींना तालुक्यातील औदयोगिक कंपन्यांमध्ये रोजगार प्राप्त करुन देणे. सध्यस्थितीत ३०० पेक्षा अधिक रोजगारींना या उपक्रमातून लाभ मिळाला आहे.
- उदयोग करणाऱ्या बचतगटांना मार्गदर्शन - शासकीय योजनेचा लाभ घेऊन उदयोग सुरु केलेल्या फेडरेशनच्या सदस्य बचतगटांना उत्पादन व विक्री व्यवस्थापनासाठी मार्गदर्शन करणे.
- विभागीय पातळीवर समन्वय - कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक विभागावर त्या-त्या विभागातील बचतगटांना एकत्रित करुन विविध जागृती कार्यक्रम आणि माहितीसत्रे आयोजित करणे.

## समृध्दी एक्सलन्स सेंटर

लार्सन ॲन्ड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या आर्थिक सहकार्यातून अन्न आणि फळ प्रक्रिया प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली.

- संगमेश्वर तालुक्यातील उदयोगाची कास धरुन आर्थिक दृष्टया स्वावलंबी होण्यासाठी

झटणाऱ्या महिलांना कौशल्य प्रशिक्षण देणारे अद्ययावत प्रशिक्षण केंद्र.

- उत्पादित मालाच्या विक्री व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करणारे केंद्र.
- विशेषतः कोकणातील फळे, भाज्या व शेतमालावर प्रक्रिया करण्याचे कौशल्य शिकविणारे केंद्र.
- लार्सन ॲण्ड टुब्रो पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या आर्थिक सहकार्यातून सुरु झालेले केंद्र.

समृध्दी एक्सलन्स सेंटर अंतर्गत उपकेंद्र - १) वांझोळे २) देवरुख ३) मानसकोंड ४) साडवली ५)धामापूर.

वैशिष्टये -

- संपूर्णपणे मोफत प्रशिक्षण.
- तंत्रशुध्द पध्दतीने मार्गदर्शन.
- तालुक्यात ५ ठिकाणी उपकेंद्र.
- फळ प्रक्रिया क्षेत्रात स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी विशेष मार्गदर्शन.
- व्यक्तिमत्व विकासासाठी तज्ञ मंडळींची विशेष मार्गदर्शन सत्रे.
- २५ लाभार्थी एका ठिकाणी असल्यास त्याच ठिकाणी प्रशिक्षण देण्याची सोय.
- भरपूर प्रात्यक्षिकांचा सराव.

अन्न आणि फळ प्रक्रिया, पॅकेजिंग व बाजारपेठ व्यवस्थापन विषयी प्रशिक्षण कार्यक्रम






















ग्रामीण भागातील महिलांना प्रशिक्षणाच्या निमित्ताने एकत्र आल्यामूळे एक आत्मविश्वास वाढणे, एकत्र येण्याची संधी मिळणे, वैचारिक देवाण-घेवाण करणे, कुटुंबामधील त्यांचा दर्जा या विषयाच्या अनुषंगाने निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांनी सहभागी होण्याच्या दृष्टीने चार चांगले पदार्थ करता येणे, सूज्ञपणे स्वत:बरोबरच आपल्या कुटुंबाच्या आरोग्याचा विचार करणे अगत्याचे असावे, इतर विषयांची माहिती मिळविण्याची संधी मिळणे या सर्व बाबींच्या दृष्टीने अतिशय चांगला बदल महिलांमध्ये घडून आल्याचे जाणवले. या प्रशिक्षणांमध्ये विविध अन्न आणि फळ प्रक्रिया पदार्थांसोबतच पॅकेजिंग, बाजारपेठांचा अभ्यास यांविषयी सुध्दा मार्गदर्शन करण्यात आले.

# समुपदेशन

ग्रामीण भागातील महिलांसाठी संस्थेचे १९९२ पासून जनजागृतीचे काम सुरु होते. हे करीत असताना कुटूंबामध्ये छोटया-मोठया कारणांनी होणारे वादविवाद आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या या प्रकर्षाने जाणवू लागल्या. अतिशय किरकोळ कारणामुळे पतीचे घर सोडून आलेली महिला ही कायमस्वरुपी माहेरीच राही. त्या महिलेच्या वादाच्या समस्येकडे लक्ष दिले जात नसे. त्यामुळे कौटुंबिक कलह वाढत जावून त्याचा परिणाम संसार तुटण्यामध्ये होत असे. काही केसेस संस्थेच्या माध्यमातून सोडविण्यात आल्या, ज्यांचे संसार भविष्यामध्ये खुप चांगले सुरु आहेत.

कार्यक्षेत्रामध्ये महिलांची गरज म्हणून त्यांच्या कौटुंबिक समस्या सोडवण्यासाठी १९९२ पासूनच संस्था समुपदेशनाचे काम करीत आली आहे. दक्षता समिती, देवरुख पोलीस स्टेशन, जिल्हास्तरीय विविध विकास समिती व समुपदेशन केंद्र या माध्यमातून शासन, यंत्रणांच्या मदतीने प्रयत्न होत आहेत. स्वीस-एड् सारख्या संस्थेच्या मदतीने गावागावातील प्रमुख व्यक्ती, कुटूंबे यांच्या पर्यंत स्त्रियांना संरक्षण देणारे कायदयाचे महत्व सांगता आले. जनजागृती, जनता व कायदेविषयक सेवादायी यंत्रणा यांच्यामध्ये समन्वय निर्माण झाला. आज काही गावांमध्ये आधार गटाची रचना तयार झाली. स्त्रिया आपल्या गटांच्या पातळीवरच नाही तर गाव पातळीवर कौटुंबिक कलह होऊ नयेत म्हणून प्रयत्न करु लागल्या आहेत. त्याचबरोबर संस्थेच्या अशा प्रयत्नामुळे गावातील पोलीस पाटील असो पोलीस स्टेशन असो व न्यायालयीन उपक्रम असो स्नेह समृध्दी संस्थेच्या माध्यमातून सहकार्य मिळते याबद्दल एक विश्वास निर्माण झाला आहे. याचा परीणाम पिडीत स्त्रियांना तर होतोच, पण पुढे जाऊन कलह कमी व्हावेत यासाठी नक्की होईल.




स्वीस-एड् पूणे यांच्या सोबत काम करीत असताना संस्थेच्या समुपदेशक सौ. सुनिता माईन यांना आय. एल. एस. लॉ कॉलेज पूणे यांच्या मार्फत समुपदेशकाचे प्रशिक्षण पूर्ण करता आले. व समुपदेशकाची पहाणी व निरीक्षण करणेकरीता लॉ कॉलेजच्या प्रतिनिधी म्हणून काम करण्याची त्यांना संधी मिळाली.

समुपदेशन करताना संस्थेच्या सौ. सुनिता माईन आणि त्यांचे निरीक्षण करताना

आय.एल.एस.लॉ कालेज पूणे यांचे माननीय प्रतिनिधी





स्वीस-एड् पूणे संचलित, चेतना विकास संस्था, पूणे यांच्या सहकार्याने कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा -२००५ याा कायदयाबाबत जागृती अभियान २००९ ते २०१३ या कालावधीमध्ये राबविण्यात आले. त्यानंतर २०१५ ते २०१८ स्वीस-एड् पूणे व हेरिटेज संस्था लांजा आणि शासकीय यंत्रणा यांच्या सहयोगाने कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा - २००५ प्रचार व प्रसार अभियान राबविण्यात आले.

यामध्ये आधारगट, अंगणवाडी सेविका, आशाताई, पोलीस पाटील, गाव प्रतिनिधी यांच्या मदतीने सदर कार्यक्रम राबविण्यासाठी त्यांची अनेक प्रशिक्षणे घेण्यात आली. संगमेश्वर तालुक्यातील महिलांसाठी मेळावे घेऊन त्यामध्ये प्रामुख्याने विधीसेवा प्राधिकरण, संरक्षण अधिकारी, महिला दक्षता कमिटी यांचा सहभाग घेऊन त्या त्या विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले.१) न्यायातील “मध्यस्थी” व्यवस्था. २) कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५. ३) दामिनी पथक व त्याचे कार्य व किशोरवयीन पालकांची जबाबदारी याबद्दल मार्गदर्शन अशा विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.


















महिला, पुरुष, युवक यांच्यासाठी गावस्तरीय बैठका, इव्हेंट आयोजित करुन कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा २००५ अंतर्गत जनजागृती करण्यात आली. गावागावांमधून महिला / पुरुष यांचे इव्हेंट आयोजित करुन विविध स्पर्धा, प्रचार फेरी, पथनाटय, खेळांच्या स्पर्धा यांचे आयोजन करुन त्यामधून कौटुंबिक हिंसा, व्यसन, वाढते ताणतणाव, नैराश्य, लिंगसमभाव, समता व समानता, घर दोघांचे, पती-पत्नी नातेसंबंध, वाढते मोबाईलचे व्यसन इ. विषयांवर स्नेह समृध्दी संस्थेमार्फत मार्गदर्शन करण्यात येते.

महिला आधार व पुरुष आधारगटांचे प्रशिक्षण, युवा-पुरुष संवाद अभियान, गावस्तरीय मोबिलाईज बैठका, जिल्हा आधारगट बैठका, संरक्षण अधिकारी प्रशिक्षण, गावस्तरीय लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण अशांसारखे उपक्रम राबविण्यात आले.

महिला जागर, महिला मेळावे, विविध स्पर्धा, प्रचार फेरी, पथनाटय, खेळांच्या स्पर्धा यांचे आयोजन















# आरोग्यविषयक कार्यक्रम

बचतगटातील महिलांनी स्वतःच्या आणि कुटूंबाच्या आरोग्याची काळजी घेणे खुप महत्वाचे होते. ग्रामीण भागातील महिला आजारांबाबत खुपच अज्ञानी होत्या. आजारांबद्‌दल त्यांच्या मनात सतत भीती असायची. एखादा आजार झाला तरी स्वतःहुन सांगण्यास त्या तयार होत नसल्याकारणाने आजार बळावत जायचा. हे लक्षात घेऊन संस्थेने सन २००३ मध्ये १८ ते ५० वयोगटातील महिलांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले. यामध्ये पुढील प्रमाणे उपक्रम राबविण्यात आले.

- किशोरवयीन मुलामुलींचे गट तयार करुन त्यांच्यामार्फत आरोग्य शिक्षण.
- माता व बाल संगोपन, सकस आहार, आरोग्याच्या चांगल्या सवयींबाबत माहिती.
- कुटूंब नियोजन, एड्स व इतर लैंगिक आजारांविषयी सातत्याने जनजागृती.
- माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांसाठी कुटूंब जीवन शिक्षणावर व्याख्याने.
- महिलांच्या पुढाकाराने गाव आरोग्य समित्यांची स्थापना.
- रक्तगट तपासणी व गाववार रक्तगट सूची.
- आरोग्य यंत्रणा व लोकांमध्ये समन्वय.

अशांसारखे उपक्रम घेण्यात आले, ज्यांमुळे लोकांची आजारांविषयीची भीती कमी झाली. आणि महिला आपल्या आजारांबाबत मोकळेपणाने बोलू लागल्या. स्वतः आणि कुटूंबातील इतर सदस्यांना उपचारांसाठी आरोग्यकेंद्रामध्ये घेऊन जाऊ लागल्या. ज्यांमुळे आजार बळावण्याची संख्या कमी झाली.





# शैक्षणिक कार्यक्रम

○ **साक्षरता अभियान –** महिलांचा सर्वांगीण विकास घडवायचा असेल तर ती महिला आणि तिचे कुटूंब साक्षर असणे खुप महत्वाचे होते. सन १९९३ मध्ये शासनाच्या साक्षरता अभियानामध्ये संस्थेने सक्रीय सहभाग घेऊन आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून या अभियानामध्ये सहभागी होऊन या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन संस्थेच्या माध्यमातुन करण्यात आले. बचतगटांतील बहुतांश महिला या निरक्षर होत्या. त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन गटातील शिकलेल्या महिलांच्या मदतीने निरक्षर महिलांना साक्षर करण्याचा प्रयत्न केला. बचतगटांच्या माध्यमातून महिलांचा सराव घेण्यात आला.

○ **साक्षरोत्तर अभियान –** शासनाने साक्षरता अभियान राबविले, परंतु साक्षरता अभियानामध्ये केवळ सही करता येणे एवढेच अपेक्षित नव्हते तर साक्षरतेमुळे लोकांचे राहणीमान सुधारावे आणि त्यांच्यामध्ये चांगला बदल घडून यावा हे अपेक्षित होते. यासाठी शासनाने १९९५ मध्ये साक्षरोत्तर अभियान राबविले. यामध्ये गटातील लोकांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. संस्थेचा महिला सक्षमिकरणाचा उद्‌देश साध्य करण्याच्या दृष्टीने हे अभियान अतिशय महत्वाचे असल्याने संस्थेने यामध्ये उत्स्फुर्त सहभाग घेतला होता. ज्याचा चांगला परिणाम गटांमधील महिलांना आणि त्यांच्या कुटूंबातील सदस्यांवर झाला.

○ **शैक्षणिक प्रकल्प –** ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे महत्व पटले असले तरी अनेक कुटुंबांची आर्थिक स्थिती हालाखीची असल्यामुळे त्या कुटुंबातील मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते. शिक्षण क्षेत्रात सरकारकडून अनेक प्रकारच्या सवलती मिळत असल्या तरी ग्रामीण भागातील सर्वच कुटुंबाना याचा लाभ मिळत नाही. आर्थिकदृष्टया दुर्बल असणाऱ्या कुटुंबातील पालकांना शिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा, वस्तु मुलांना पुरवणे शक्य होत नाही. कुटुंबातील मुलांची संख्या जास्त असेल तर यामध्ये विशेषतः मुलींना शिक्षण सोडून दयावे लागते. अशा कुटुंबातील मूलामुलींना जर शिक्षण मिळाले तरच ते कुटूंब प्रगतीची वाटचाल करु शकेल. याकरीता प्रथम आपण या कुटूंबातील मूलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण घेण्यास मदत करु या उद्‌देशाने स्नेह समृध्दी मंडळ स्वतः तसेच काही संवेदनशील आणि सामाजिक जाणीव असणाऱ्या देणगीदारांकडुन मुलांना शैक्षणिक प्रकल्पाच्या माध्यमातून सन २०१६ पासून आर्थिक मदत करीत आहे. यामध्ये विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी अधिक प्राधान्य देऊन त्यांना या प्रकल्पामधून कसा लाभ देता येईल यासाठी संस्था प्रयत्न करीत आहे. यामधूनच अशाच संवेदनशील आणि सामाजिक जाणीव असणाऱ्या स्वयंसेवकांकडून हेल्पलाईन या उपक्रमाच्या

माध्यमातून विदयार्थी आणि विशेषतः विदयार्थ्यीनींना शैक्षणिक मार्गदर्शन करुन भविष्यामध्ये त्यांना आर्थिकदृष्टया स्वतःच्या पायावर उभं राहण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यात येत आहे.

### शैक्षणिक सहाय्य प्राप्त काही विदयार्थी आपल्या पालकांसमवेत



### आपण आमच्या संस्थेला खालीलप्रमाणे मदत करु शकता.

१) विविध उपक्रम राबविण्यासाठी आर्थिक मदत.

२) विविध उपक्रमांसाठी वेळोवेळी आवश्यक असलेले सल्ला व मार्गदर्शन.

३) संस्थेने सुरु केलेल्या हेल्पलाईन मध्ये सहभागी होऊन विदयार्थीनी व युवकांना शैक्षणिक व व्यावसायिक कारकीर्द निवडण्यासाठी मार्गदर्शन.

४) संस्थेला आवश्यक असलेले आधुनिक तंत्रज्ञान किंवा उपकरणे पुरविणे.

५) विविध प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रम/कार्यशाळांमध्ये मार्गदर्शनासाठी प्रत्यक्ष सहभाग.

६) महिला गटांनी तयार केलेल्या उत्पादनांची उत्पादन, उत्पादनाच्या पध्दती, पॅकेजिंग आणि मार्केटिंगसाठी सहाय्य.

आपल्या सुचनांचे आम्ही स्वागतच करु. कृपया आमच्या संस्थेच्या संपर्कात रहावे, ही विनंती.

### संपर्कासाठी वैयक्तिक भ्रमणध्वनी क्रमांकः-


सौ. श्रध्दा रामचंद्र देशपांडे
अध्यक्षा
९७६९२५२९४०, ९४२३२९३४९१.

श्री. अनिल विनायक कुडाळकर
मुख्य कार्यकारी अधिकारी
७५२२९४०००३, ९४२०१५६९५३.